गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक ३२ वा ● मंगळवार १८ जून २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 32 | Date : 18/06/2024 blow Tuesday Page 4 Price 4

## राज्यात ४४ लाख ६० हजार मिळणार गणवेश


**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

राज्यात 'एक राज्य एक गणवेश' योजनेची अंमलबजावणी २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षापासून करण्यात येत असून याअंतर्गत शासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थेच्या इयत्ता पहिली ते आठवीतील सर्व विद्यार्थ्यांना प्रत्येकी दोन मोफत गणवेश पुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामध्ये एक नियमित स्वरूपाचा गणवेश तर स्काऊट व गाईड या विषयासाठी दुसरा गणवेश असणार आहे. राज्यातील ४४ लाख ६० हजार ४ विद्यार्थ्यांना हे गणवेश मिळणार आहेत. दरम्यान गणवेशाच्या शिलाईचे काम जोमाने सुरू असून विद्यार्थ्यांना लवकरात लवकर गणवेश उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले असल्याची माहिती शालेय शिक्षण विभागामार्फत देण्यात आली आहे. गणवेशासाठी प्रती गणवेश ३०० रुपये आर्थिक तरतूद उपलब्ध असून यामध्ये १९० रुपये कापड खरेदीकरिता तर ११० रुपये शिलाई, अनुषंगिक खरेदी आणि वाहतुकीकरिता निश्चित करण्यात आले आहेत.

## प्रियंका गांधी-वढेरा वायनाडच्या उमेदवार; राहुल यांची रायबरेलीची खासदारकी कायम

**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज**

काँग्रेस खासदार राहुल गांधी रायबरेलीची जागा कायम ठेवणार असून वायनाडची जागा त्यांच्या भगिनी प्रियंका गांधी लढवितील, असे पक्षाध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी सोमवारी जाहीर केले. या माध्यमातून प्रियंका प्रथमच निवडणुकीच्या राजकारणात प्रवेश करणार आहेत. लोकसभा निवडणुकीत राहुल गांधी उत्तर प्रदेशातील रायबरेली आणि केरळमधील वायनाड या दोन्ही जागांवर विजयी झाले होते. त्यांना नियमानुसार एक जागा सोडावी लागणार असल्याने त्यावर विचारमंथन करण्यासाठी सोमवारी येथे पक्षांतर्गत उच्चस्तरीय बैठक झाली. बैठकीला राहुल, प्रियंका, खरगे यांच्यासह माजी पक्ष्याध्यक्षा सोनिया गांधी आणि महासचिव के. सी. वेणूगोपाल उपस्थित होते. या बैठकीत प्रियंका गांधी यांना वायनाडची उमेदवारी देण्याचा निर्णय घेण्यात आला.वायनाडची जागा सोडण्याचा निर्णय आपल्यासाठी कठीण होता. आपले त्या मतदारसंघाकडे दुर्लक्ष होणार नसून उलट आता वायनाड आणि रायबरेली या मतदारसंघांना प्रत्येकी दोन खासदार मिळतील, असे ते म्हणाले.



काँग्रेस नेते राहुल गांधी केरळमधील वायनाड लोकसभा मतदारसंघातून खासदारकीचा राजीनामा देणार असून रायबरेलीचे खासदार म्हणून कायम राहणार आहेत. या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी वायनाड आणि रायबरेली या जागांवर विजय मिळवला. आता ते रायबरेलीची खासदारकी कायम ठेवणार आहेत.राहुल गांधी यांनी रायबरेलीमध्ये भाजपचे दिनेश प्रताप सिंह यांचा दारुण पराभव केला होता. तर वायनाडमध्ये माकपाचे एनी राजा यांच्याविरोधात तीन लाखांपेक्षा जास्त मतांनी विजय मिळवलाय होता.

उत्तर प्रदेशमधील रायबरेली मतदारसंघ गांधी कुटुंबांचा गड मानला ताजो. गेल्या निवडणुकीत काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी यांनी या मतदारसंघातून निवडणूक लढवली होती. यावेळी त्या मैदानात उतरल्या नाहीत. त्या राज्यसभा सदस्य आहेत.

## पुढील २४ तासांत पाऊस हुलकावणी देणार की दिलासा?

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

मान्सूननं देशात हजेरी लावल्यानंतर दक्षिणेकडील राज्य आणि महाराष्ट्राचा काही भाग वगळता उत्तरेकडील राज्यांमध्ये मात्र या वरुणराजानं पाठ फिरवल्याचं पाहायला मिळालं. पहिल्या आठवड्यात कोसळणारा हा मान्सून दुसऱ्या आठवड्यात मात्र महाराष्ट्रातही माघार घेताना दिसला, ज्यामुळं आता शेतकरी वर्गासह हवामान विभागानंही चिंतेचा सूर आळवला आहे.

राज्याच्या दिशेनं येणाऱ्या नैऋत्य मोसमी वाऱ्यांचा जोर ओसरल्यामुळं पावसानं मोठी विश्रांती घेतल्याचं पाहायला मिळत आहे. ज्यामुळं कोकण, मुंबई, पुणे या भागांमध्ये काहीशी तापमानवाढ नोंदवण्यात आली आहे. पुढील २४ तासांत मात्र इथल्या उकाड्यापासून दिलासा मिळणार असल्याचे संकेत देत याच भागांमध्ये पावसाचा जोर वाढणार असल्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. सातारा, सांगली आणि कोकणामध्ये पावसाची समाधानकारक हजेरी असू शकते, तर मुंबईकरांची प्रतीक्षा मात्र वाढताना दिसणार असून मराठवाडा आणि विदर्भाला पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे.

यंदाच्या वर्षी मान्सूननं पहिल्या टप्प्यात मराठवाड्यासह संपूर्ण कोकण आणि मध्य महाराष्ट्रात मजल मारली. तर, तिथं विदर्भात अमरावती आणि चंद्रपूर गाठलं. त्यानंतर मात्र मान्सूननं राज्यात समाधानकारक कामगिरी केली नसल्यामुळं सातत्यानं होणाऱ्या हवामान बदलांचा फटका शेतीच्या कामांवर आणि नागरिकांच्या आरोग्यावर होताना दिसत आहे. अनेक भागांमध्ये साथीचे आजार वाढले असून, क्षणात उकाडा आणि क्षणात पाऊस ही परिस्थिती अडचणी निर्माण करताना दिसत आहे.

सोलापुरात तीन दिवसांच्या विश्रांतीनंतर दमदार पावसाला सुरुवात झाली. उत्तर सोलापूर तालुक्यातील ग्रामीण भागाला पावसाने चांगलच झोडून काढलं. अवघ्या अर्ध्या तासाच्या पावसामुळे शेतात पाणीच पाणी साचलं. पुढील चार दिवस जिल्ह्यात दमदार पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. नागपूर । पान २ वर

## विधानसभेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस ७० ते ८० जागांची मागणी करणार : प्रफुल्ल पटेल

**गोंदिया/दैनिक यशसिध्दि न्यूज**

आगामी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट ७० ते ८० जागा मागणार आहे. आमच्याकडे असलेल्या आमदारांच्या संख्येवरून हा दावा करणार असून यावरचा अंतिम निर्णय मात्र हा महायुतीच्या बैठकीत होईल. तसेच लोकसभेप्रमाणेच विधानसभा निवडणुकासुद्धा महायुतीत लढणार असल्याचे खासदार प्रफुल्ल पटेल यांनी रविवारी गोंदिया येथे आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले.



राज्यातील लोकसभा निवडणुकीत भाजप महायुतीला मोठा फटका बसला. त्यात, सर्वात कमी जागा अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला मिळाल्या. त्यामुळे राष्ट्रवादीच्या नेत्यांची घोर निराशा झाली. तरीही पराभवाने खचायचे नसते, आता विधानसभेच्या तयारीला लागा अशा सूचना राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना केल्या आहेत. महायुतीतमध्ये आता विधानसभेच्या जागावाटपावरुन खलबते सुरू होणार आहेत. लवकरच मंत्रिमंडळ विस्तार होईल गेल्या अनेक दिवसांपासून महायुती सरकारचा । पान २ वर

## झारखंडमधील चकमकीत ४ माओवादी ठार

**चायबासा/दैनिक यशसिध्दि न्यूज**

झारखंडच्या पश्रि्चम सिंघभूम जिल्ह्यात सोमवारी सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत ४ माओवादी ठार झाले. या चौघा माओवाद्यांमध्ये एका महिलेचाही समावेश आहे. या कारवाईत पळून जाण्याच्या



प्रयत्नात असलेल्या दोघांना अटक करण्यात सुरक्षा दलांना यश आले. रांचीपासून २०० किलोमीटर अंतरावील गुआ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील लिपुंगा विभागात पहाटे पाचच्या सुमारास ही चकमक झाल्याची माहिती झारखंड पोलिसांचे प्रवक्ते आणि महानिरीक्षक अमोल होमकर यांनी 'पीटीआय'ला दिली. विभागीय कमांडर कांदे होनहागा (रा. चायबासा, थळकोबाद), । पान २ वर

## विठ्ठलाच्या आषाढी महापूजेसाठी मुख्यमंत्र्यांसमवेत राज्यातील १० मानाच्या पालखी सोहळा प्रमुखांना ही मिळणार संधी..

### शासनाकडून दिंड्यांना मिळणाऱ्या वीस हजार रुपये अनुदानाची दिंडी प्रमुखांनी केले स्वागत

**पंढरपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या श्री विठ्ठलाच्या आषाढी एकादशी महापूजेसाठी मुख्यमंत्र्यांच्या समवेत आता राज्यातील मानाच्या दहा पालखी सोहळा प्रमुख व संस्थांचे अध्यक्ष यांना संधी मिळणार असल्याची माहिती श्री संत मुक्ताबाई पालखी सोहळा प्रमुख ह भ प रविंद्र महाराज हरणे यांनी दिली दरम्यान शासनाने आषाढी वारीसाठी सोहळ्यात चालणाऱ्या सुमारे पंधराशे दिंड्यांना प्रत्येकी २०००० रुपये अनुदान देण्याच्या निर्णयाचे राज्यातील दिंडी प्रमुखांनी स्वागत केले मुंबई मंत्रालयात शिवसेना अध्यात्मिक आघाडीचे प्रमुख ह भ प अक्षय महाराज भोसले यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील दहा मानाच्या पालख्या सोहळा प्रमुख व संस्थांच्या अध्यक्षांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली यावेळी मुख्यमंत्र्याकडे महापूजेची मागणी करण्यात आली



हरणे म्हणाले पूर्वी श्री विठ्ठलाच्या पहाटेच्या महापूजेला राज्यातील मानाच्या पालखी सोहळा प्रमुख व संस्थान अध्यक्षांना बोलवले जायचे पुढे ती पद्धत बंद करण्यात आली राज्यातील कानाकोपऱ्यातून शेकडो किलोमीटर ची पायपीट करून लाखो वारकरी श्री विठ्ठलाच्या दर्शनाला येतात या वारकऱ्यांना विठुरायाचे साधे दर्शन सुद्धा होत नाही व या वारकऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून शासनाने राज्यातील मानाच्या दहा पालख्या सोहळा प्रमुख व संस्थान अध्यक्ष यांना महापूजेला निमंत्रित करावे आषाढी वारी पालखी। पान २ वर

## धडा घेणं गरजेचं, सांगलीच्या जागेवरून पृथ्वीराज चव्हाणांचा उद्धव ठाकरेंना अप्रत्यक्ष टोला

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी संपली आहे. आता काही महिन्यांमध्ये विधानसभेची निवडणूक जाहीर होण्याची शक्यता आहे. त्याच्या पार्श्र्वभूमीवर राजकीय पक्ष तयारीला लागले आहेत. या संदर्भात महायुती आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या बैठका सुरू आहेत. तसेच जागा वाटपासंदर्भातही चर्चा सुरू आहेत. मात्र, असं असलं तरी सांगलीत महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्ये सर्वकाही अलबेल नसल्याचं चित्र आहे. सांगलीच्या जागेवरून महाविकास आघाडीत लोकसभा निवडणुकीपासूनच धुसफूस पाहायला मिळत आहे.



सांगली लोकसभा मतदारसंघात अपक्ष उमेदवार विशाल पाटील यांचा विजय झाला, तर ठाकरे गटाचे चंद्रहार पाटील यांचा पराभव झाला. यानंतर विशाल पाटील आणि चंद्रहार पाटील यांच्यात आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. त्यामुळे महाविकास । पान २ वर



# संपादकीय

## ते पाहावे लागेल...

मोदींच्या अगोदरच्या दोन विजयात महाराष्ट्राने मोठा वाटा उचलला होता. यंदा मात्र तसे झाले नाही. त्याला प्रमुख कारण म्हणजे गेल्या वर्ष-दीड वर्षांत महाराष्ट्राच्या राजकारणात झालेली प्रचंड उलथापालथ. लोकसभेच्या निवडणुकीकडे विशेष लक्ष यासाठी होते की राज्यातील जनता या तत्त्वशून्य फोडाफोडीकडे कसे पाहते याचा त्यातून कौल मिळणार होता. मतदारांनी 'फोडा आणि राज्य करा'ला थारा दिला नसला तरी बरेच प्रश्न अद्याप अनुत्तरित आहेत. त्यांची उत्तरे विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतरच मिळणार आहेत. महाराष्ट्राला डबल इंजिन सरकारसोबत जायचे आहे का, राज्यात खरेच कोणावर अन्याय झाला होता की आतापर्यंत जे झाले त्याला राजकारणाचा भाग म्हणून सोडून द्यायचे आहे याचा फैसला राज्यातील जनता करणार आहे. त्या दृष्टिकोनातून विचार करता विधानसभेची निवडणूक हेच अंतिम युध्द असणार आहे व त्याला आता काहीच महिने बाकी आहेत. गेली विधानसभा निवडणूक भाजप आणि शिवसेना यांनी एकत्र लढवली. या युतीला स्पष्ट बहुमत मिळाले. तथापि, शब्दांच्या कथित फिरवाफिरवीवरून बिनसले. उध्दव ठाकरेंनी काँग्रेस राष्ट्रवादीशी हातमिळवणी करत अडीच वर्षे ुख्यमंत्रिपद उपभोगले. नंतर त्यांच्या पक्षालाच सुरूंग लावत पंगू करण्यात आले. महागाई, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, कांद्याबाबतचे केंद्र सरकारचे धरसोडीचे धोरण हे प्रमुख मुद्दे आहेत. भाजपला महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीत सहानुभूतीच्या लाटेसोबतच या मुद्द्यांचाही फटका बसला. लोकसभेतील पीछेहाटीनंतरही किमान आज राज्यात निवडणूक जाहीर झाली तर उध्दव ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस हेच दोन प्रमुख चेहरे राहणार आहेत. काँग्रेस हा तिसरा प्रबळ फॅक्टर आहे. तथापि, आज त्यांच्याकडे राज्याचा नेता म्हणून पाहावा असा चेहरा नाही. त्याखेरीज अजित पवार, एकनाथ शिंदे आणि खुद्द शरद पवार व इतर लहानसहान पक्ष आहेतच. अंतिम युध्दाची जुळवाजुळव झाली आहे. पुन्हा पळवापळवीचा हंगामही सुरू होईल. पुढील दोन-अडीच महिन्यांत प्यादी सरकवली जातील. लढाई सुरू होण्याच्या अगोदरच बेरीजवजाबाकी केली जाईल. आता प्रश्न राज्याचा नेता निवडण्याचा आहे. त्याकरता मतदारांसमोर पर्यायही आहेत. शिवाय कोणतीही निवडणूक लढवताना सगळ्यांना समान संधी असली पाहिजे, असे अपेक्षित असते. लोकसभेच्या निकालाने सगळ्यांना ती संधी दिली आहे. आता या निर्णायक युध्दात कोणाची सरशी होते ते पाहावे लागेल.

दान करणे खरे तर खूप मोठी गोष्ट आहे. दान ही प्रक्रिया आपोआप व नकळत घडणारी क्रिया आहे. दानाने खूप काही बदल, प्रगती आणि महत्वाच्या घटनाना गती मिळते. दान करणे हे मनुष्याच्या सुददृढ मनस्थिती चे दर्शन घडविते. दानाने माणूस प्रसन्न्न होतो आणि इतरांना आपल्या कारण आनंदी होताना पाहणे हे एका उत्कृष्ट मानसिकते चे लक्षण आहे. म्हणून दान करणे ही मानवाची मानसिक व सामाजिक गरज सुद्धा आहे.

लहानपणी मित्र मैत्रिणीला काहीही देताना त्या बालकाच्या चेहऱ्या वरील आनंद तुम्ही केव्हा पाहिला आहे का? नसेल पाहिला तर आताही तुमच्या मुलामुली च्या हातून दान करून पहा आणि त्यांच्या चेहऱ्या वरचा आनंद टिपून काढा. गरजवंत व्यक्तीला दान करणे हे खरोखर माणुसकीचे उत्तम उदाहरणं आहे.

१) आता दान हे बऱ्याच स्वरूपात असू शकते. वस्तू रूप तर सर्वांनाच माहित आहे. आपल्याला नको असलेल्या वस्तू म्हणजे घरातील कपडे, भांडी कुंडी, फुर्निचर, कपाट, पुस्तकं, स्टेशनरी, टीव्ही, फ्रीझ, इलोक्ट्रॉनिक वस्तू, अंथरून बेड, फोन, बॅग, राशन ई ई हे तर सर्वच लोक दान देत असतात त्याकारण एकाला नको असलेले दुसऱ्याची गरज भागवते. अन्न दान ही ह्याच मध्ये येते

२) दुसरे स्वरूप आहे पैसे, रक्कम, डोनेशन, हे तर दान खूपच महत्वाचे आहे. या कारण तर माणसाचे जगणे सुरळीत होते सहज होते. पैसे रूपाचे दान आपण कोणाची शाळेची फी भरून, कोणाचे हॉस्पिटल चे पेमेंट करून तर कोणाचेही कुठेही कोणत्याही कामाचे पैसे भरून ते दान स्वरूप बनवू शकतो. ह्या दान कारण कोणत्याही गरजवंत व्यक्तीचे शिक्षण पूर्ण होते, जीव वाचतो, उपासमार थांबते, निवारा मिळतो, ई ई... गरजा भागतात. आणि श्रीमंत लोकां नी दान केल्याने टॅक्स मध्ये




सवलत मिळते.

३) तिसरे महत्वाचे दान म्हणजे सेवा हे तर परमानंद देणारे दान असते ह्यात आपल्या कडे दान देण्याची येईपत नसेल तर प्रत्यक्ष हजर राहून गरजवंत व्यक्ती साठी उपलब्ध असणे तिथे आपला वेळ खर्च करणे हा सुद्धा दानाचा खूप मोठा भाग आहे. अश्या प्रकारे दान करताना आपण प्रत्यक्ष असल्याने आनंद हा उच्चकोटींचा असतो. आणि समोरच्या चा आशीर्वाद हा तात्काळ फळ देणारा असतो हॉस्पिटल, आश्रम, शाळा, सामाजिक संस्था, छत्रह्ज अश्या ठिकाणी वा घरगुती ओळखी पाळखी च्या लोकांना मदत करून हे दान आपण करू शकतो

४) आता आणखी ही काही स्वरूपात आपण आपल्या प्रॉपर्टी तील काही अंश दान करू शकतो. काही लोकांना सरकारी पेन्शन असते त्यांच्या मृत्यू नंतर ती पेन्शन त्यांच्या पती वा पत्नी च्या नावे होते व त्यांना मरेपर्यंत मिळते पण ज्या पेन्शनर लोकांना पती पत्नी हयात नसतील त्यांच्या विधवा मुलगी वा अपंग मुलाला ती सुरु राहते. पण असे कोणीच घरात नसेल तर मग पेन्शन बंद होते तर जर काही लोकांनी ठरवले तर हीच पेन्शन तुम्ही तुमच्या मृत्यू नंतर दान देऊन तुम्ही सुरु ठेऊ शकता एखाद्या गरीब महिलेशी/पुरुषाशी कायदेशीर विवाह कागद बनवून तिथे तिचे/त्याचे नावे ती पेन्शन दान करू शकता त्या साठी त्या महिलेला पत्नी/पुरुषाला पती म्हणून स्वीकारण्याची गरज नाही. तशी आपापसात सगणमताने नोटरी बनवू शकता. म्हणजे इतर प्रॉपर्टी वर क्लेम करता येणार नाही असा.

५) अजून एक दान म्हणजे काही लोकांना मुलं नसते आणि त्यांच्या नंतर त्यांची प्रॉपर्टी नातेवाईक वा धर्मादाय संस्थांना जाते. अश्या लोकांनी जिवंतपणी काही होतकरू गरीब अनाथ हुशार मुले व मुलींचा शोध घेऊन त्याच्या नावे आपल्या प्रॉपर्टी चा काही अंश दत्तक पत्र करून त्यांना आपल्या जिवंतपणी देऊन दान करू शकतात असे दान एक गरीब मुलामुलीच्या भविष्यात प्रकाश टाकू शकते. त्याच्या किंवा तिच्या नावे जमीन, एफ डी, पोलिसी, एखादे घर ई ई प्रकारे तुम्ही दान करू शकता

६) आणि आणखी एक दान म्हणजे अंग दान...

हेही खूप महत्वाचे दान आहे. आपण जर आरोग्य उत्तम राखले असेल तर आपले शरीर अवयव इतरांच्या उपयोगी येऊ शकतात. ह्या दानाने अंध जग बघू शकतात. शरीरातील प्रत्येक अवयव खूप महत्वाचा असतो ह्रदय फुफुस यकृत दात डोळे मूत्रॅपिंड ई ई आपल्या मृत्यू नंतर ही आपण कोणाच्या ना कोणाच्या उपयोगी पडू शकतो.अश्या तर्हेने मनुष्य हा माणूस ह्या जन्माचे पांग फेडू शकतो. आणि जिवंत पणी च परमानंद चा आनंद अनुभवू शकतो. तर मग उठा आणि शोधा आजूबाजूला होतकरू हुशार गरीब अनाथ अशी मुले, मुली.महिला पुरुष ... आणि करा दान भरभरून.... आपल्या समाजाला जनतेला आपण प्रगती मार्गांवर नेऊया. गरिबी हटाव मोहिमेत सहभागी होऊया

**जयभीम नमो बुध्दाय**

जय महाराष्ट्र जय संविधान जय भारत

**कीर्तिसंध्या मो.८४२१७५२३१५/७०८३३५१७२५**

पान १ वरुन

## विठ्ठलाच्या आषाढी महापूजेसाठी ..

सोहळे व शासन यांच्या समन्वयासाठी जिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी नियमावर श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या सल्लागार मंडळात संस्थान अध्यक्ष व सोहळा प्रमुखांचा समावेश करावा आधी मागण्यात त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याबाबत सकारात्मकता दर्शवले असून आषाढी वारी वारकऱ्यांच्या दृष्टीने सुरक्षित व आनंददायी होण्यासाठी शासन सर्वतोपरी मदत करेल असे सांगितले.यावेळी आषाढी वारीमध्ये वारकऱ्यांच्या सोयी सुविधांसाठी शिवसेना धर्मवीर अध्यात्मिक वारकरी सेनेच्या वतीने वारकरी सेवा रथ काढण्यात येणार असून त्याद्वारे वारीत वारकऱ्यांना आवश्यक त्या सेवा पुरवल्या जाणार असल्याची माहिती या संघटनेचे प्रदेशाध्यक्ष ह भ प अक्षय महाराज भोसले यांनी दिली

यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे श्री संत ज्ञानेश्र्वर महाराज पालखी सोहळा प्रमुख योगी निरंजननाथ संत तुकाराम महाराज संस्थानचे अध्यक्ष पुरुषोत्तम मोरे सोहळा प्रमुख मानिक मोरे संत सोपान देव संस्थांचे अध्यक्ष त्रिगुण महाराज गोसावी संत मुक्ताबाई सोहळा प्रमुख रवींद्र महाराज हरणे राणू महाराज वासकर आधीच दिंडी प्रमुख व मानकरी उपस्थित होते

## धडा घेणं गरजेचं, सांगलीच्या..

आघाडीत सांगलीमध्ये धुसफूस सुरू असल्याची चर्चा आहे. यासंदर्भात आता काँग्रेसचे नेते पृथ्वीराज चव्हाण यांनीही भाष्य करत अप्रत्यक्ष टोला लगावला आहे.

लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या माध्यमातून सांगली लोकसभा मतदारसंघात ठाकरे गटाने चंद्रहार पाटील यांना उमेदवारी दिली होती. मात्र, या मतदारसंघामधून काँग्रेसही उमेदवार देण्यास इच्छुक होतं. मात्र, महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्ये चर्चा झाल्यानंतर ही जागा ठाकरे गटाला देण्यात आली. त्यानंतर काँग्रेसचे नेते विशाल पाटील यांनी अपक्ष निवडणूक लढवली. यामध्ये विशाल पाटील यांनी चंद्रहार पाटील यांचा पराभव केला. यावरून आता पृथ्वीराज चव्हाण यांनी म्हटलं की, जनसामान्यांच्या आणि कार्यकर्त्यांच्या इच्छेविरूद्ध तिकीट देता कामा नये, हा धडा घेणं गरजेचं आहे, असा टोला नाव न घेता पृथ्वीराज चव्हाण यांनी लगावला आहे.

मुंबई उत्तर पश्र्चिम लोकसभा मतदारसंघात जी घटना घडली. त्याबद्दल निवडणूक आयोगाने गुन्हा दाखल केला आहे. काहीतरी घडल्याशिवाय निवडणूक आयोगाने गुन्हा दाखल केला का? दाखल झालेला एफआयआर हा सर्वांना दिला पाहिजे. तुम्ही ती माहिती गुप्त का ठेवली? आता मोबाईलवर पासवर्ड येतो आणि त्यातून ईव्हीएम उघडता येते? ही नवीन गोष्ट कोठून आली? आधी कोस्टल बॅलेटची मोजणी करून ती जाहीर करायला हवी. पण ते झालेलं दिसत नाही. त्यामुळे हा आरोप ईव्हीएमवर नाही तर मुंबईतील उत्तर पश्र्चिम मतदारसंघात झालेल्या प्रकाराबद्दल आहे. त्यामुळे आम्ही निवडणूक आयोगाकडे या संदर्भातील मागणी करत आहोत. अर्थात आमची मागणी आहे की या सर्व प्रक्रियेवर लोकांचा विश्र्वास बसला पाहिजे, असं पृथ्वीराज चव्हाण यांनी म्हटलं.

## विधानसभेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस ..

मंत्रिमंडळ विस्तार थांबलेला आहे. त्यासंदर्भात प्रफुल्ल पटेल यांना विचारले असता, लवकरच महाराष्ट्रात मंत्रिमंडळ विस्तार होणार आणि जी पदे खाली आहेत, त्याठिकाणी विस्तार करण्या येईल. तसेच आता विधानसभा निवडणुकांसाठी राहिलेल्या महिन्यात चांगल्या जोमाने काम करता येईल, असेही त्यांनी सांगितले. विधानसभेला चित्र बदलेल देशामध्ये नुकताच पार पडलेले लोकसभा निवडणुकीमध्ये एनडीए सरकारला अपेक्षित यश आले नाही. महाराष्ट्रातदेखील परिस्थिती वेगळीच राहिली. मात्र, आगामी काळात होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये परिस्थिती काहीतरी वेगळी राहील, विधानसभा निवडणुकीमध्ये हे चित्र बदलेल, असेही पटेल यांनी म्हटले.

## झारखंडमधील चकमकीत

उपविभागीय कमांडर सिंगराई ऊर्फ मनोज (रा. जयगूर), कमांडर सूर्या ऊर्फ मुंडा देवगम आणि महिला कॅडर जुंगा पूर्ती ऊर्फ मारला अशी चौघा मृतांची नावे आहेत. तर कमांडर टायगर ऊर्फ पांडु हंसदा आणि बत्री देवगम अशी दोघा अटक केलेल्या माओवाद्यांची नावे आहेत. शोध मोहिमेदरम्यान एक इन्सास रायफल, दोन एसएलआर, तीन रायफल (.३०३) आणि एक (९ मिमी) पिस्तूल जप्त करण्यात आली आहे.

सीपीआय (माओवादी) पॉलिटब्यूरो सदस्य मिसीर बेसरा आणि केंद्रीय समिती सदस्य अनल यांच्या पथकातील अजय महतो, कांदे आणि सिंगराई यांच्यासह काही माओवादी मोठा घातपात घडवून आणण्यासाठी लिपुंगा जंगलाजवळ आल्याची माहिती माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार चायबासा पोलिस, कोब्रा २०९, झारखंड जग्वार आणि सीआरपीएफ यांचा समावेश असलेल्या सुरक्षा दलांनी संयुक्त शोध मोहीम राबवली. हे पथक पहाटे पाचच्या सुमारास लिंपुगा जंगलाजवळ पोहोचले असता, माओवाद्यांनी त्यांच्यावर हल्ला चढवला. त्याला प्रत्युत्तरादाखल सुरक्षादलांनीही गोळीबार केला. सुमारे तासभर ही चकमक सुरू होती. गोळीबार थांबल्यानंतर पथकाने परिसराची झडती घेतली असता, अत्याधुनिक शस्त्रांसह चार जणांचे मृतदेह ताब्यात घेण्यात आले. तसेच तेथून पळून जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या दोन माओवाद्यांना पथकाने अटक केली. सुरक्षा दलांच्या सततच्या कारवायांमुळे काही थोडय़ा भागातच माओवादी सक्रिय आहेत. ही 'ऐतिहासिक' कामगिरी असल्याचे सांगून होमकर यांनी माओवाद्यांना आत्मसमर्पण करण्याचे आवाहन केले आहे.

## पुढील २४ तासांत पाऊस

शहरातही सोमवारी मुसळधार पावसाने हजेरी लावली. सोसाट्याचा वारा आणि विजांच्या कडकडासह शहरात पाऊस झाला. पावसामुळे प्रचंड उकड्यापासून नागपूरकरांना थोडा दिलासा मिळाला खरा पण, हा मान्सूनचा पाऊस नसल्याचं प्रादेशिक हवामान विभागाने स्पष्ट केलं. तिथं कोकणात रत्नागिरीच्या चिपळूण तालुक्यात ढगफुटीसारखा पाऊस झाला आहे.

# तृणधान्याचे जाणू महत्त्व मिळेल त्यातून जीवनसत्व

तृणधान्याच्या सेवनामुळे शरीरपोषणासाठी कमी खर्चात अधिक प्रमाणात उर्जा तृणधान्यांतून मिळतात. तंतुमय पदार्थाव्यतिरिक्त तृणधान्ये ही खनिजे, बी कॉम्प्लेक्स, जीवनसत्वे, लोह, कॅल्शियम व जस्त यांसारख्या सूक्ष्म पोषक घटकांनी समृद्ध आहेत. तृणधान्याच्या सेवनामुळे रक्तातील ग्लुकोज नियंत्रणात राहते. तृणधान्ये ही आरोग्याला चालना देणाऱ्या फायटोकेमिकल्स, फिनोलिक संयुगे, टॅनिन यांसारख्या घटकांनी समृद्ध असून त्यामध्ये अँटिऑक्सिडंट्स गुणधर्म आहेत. जागतिक आरोग्य संघटनेच्या २०२१ च्या अभ्यासातून असे दिसून आले आहे की, तृणधान्यांमुळे टाईप २ च्या मधुमेहाचा धोका कमी होण्यास व मधुमेह असलेल्या व्यक्तींमध्ये एचबीए १ सी चे प्रमाण कमी होण्यास मदत होऊ शकते.

तृणधान्ये पचनक्रिया सुधारण्यास मदत

तृणधान्ये आपल्याला पोषणविषयक सुरक्षा पुरवितात. तृणधान्ये ही तंतुमय पदार्थानी समृध्द असलेली धान्य असून ती मानवी आतड्यामधील सूक्ष्म जीवसमूहासाठी चांगले जीवाणू म्हणून कार्य करतात, तृणधान्यांतील तंतुमय पदार्थ स्थूलांत्रे सजल ठेवतात आणि चयापचय क्रिया अतिशय चांगल्या स्थितीत ठेवतात. अशा प्रकारे तृणधान्य ही पचनविषयक आरोग्य चांगले ठेवण्यात योगदान देतात व आतड्यातील हालचाली नियमीत ठेवण्यास मदत करतात.



रागी किंवा नाचणी (फिंगर मिलेट)

रागी किंवा नाचणी 'आफ्रिकन बाजरी'या नावानेही ओळखली जाते. नाचणी हे सर्वाधिक पोषक तृणधान्य मानले जाते. प्रथिने, तंतुमय घटक व खनिजे यांचा उत्तम स्त्रोत आहे. नाचणीमध्ये मोठ्या प्रमाणात कॅल्शियम व पोटॅशियम असते नाचणीमध्ये असलेल्या कमी ग्लायसेमिक संवेदनशीलतेमुळे नाचणीयुक्त आहारामुळे मधुमेह असलेल्या व्यक्तीच्या रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणात ठेवण्यात मदत होते. रक्तदाब, यकृताचे विकार व दमा आजराच्यावेळी तसेच स्तनपान करणाऱ्या मातांसाठी नाचणीयुक्त आहार घेण्याची शिफारस करण्यात येते. नैसर्गिक लोह भरपूर प्रमाणात असते आणि त्याच्या सेवनामुळे अशक्तपणा दूर होण्यास मदत होते.

वरई (प्रोसो मिलेट)

प्रोसो मिलेट पॅनिकम मिलिसेम, चायनीज मिलेट, वऱ्याचे तांदूळ, वरी व हिंदीत चिन आदी नावाने ओळखले जाते. खनिजे, पचनशील तंतुमय घटक, पॉलिफिनॉल्स, जीवनसत्वे (विटॅमिन) व प्रथिनांनी समृद्ध असल्यामुळे आरोग्यासाठी ते बहुगुणी ठरते. ग्लुटेनयुक्त आहाराचा त्रास असलेल्या लोकांसाठी फायदेशीर आहे. वरईमध्ये उच्च पातळीचे लेक्टिनिन असते त्यामुळे मेंदू विषयक आरोग्यासाठी ते उपयुक्त ठरते. याचा ग्लायसेमिक निर्देशांक कमी असून टाईप २ मधुमेह असलेल्या मधुमेहींसाठी उत्तम अन्न ठरते.

कांगणी किंवा राळ फॉक्सटेल तृणधान्य (सेक्टारिआ इटॅलिका)

फॉक्सटेल तृणधान्य (सेक्टारिआ इटॅलिका) ही मराठीमध्ये कंगणी किंवा राळ या नावाने ज्ञात असून ग्लुटेनमुक्त धान्य आहे, ज्यात तंतुमय पदार्थ, प्रथिने व खनिजे अधिक प्रमाणात असतात. थियामिन, नियासिन व जीवनसत्व बी-६ आणि मॅग्रेशियम, पोटॅशियम व जस्त या खनिजांचा समावेश असलेला उत्तम स्त्रोत आहे. कमी शर्करा असलेले अन्न असल्यामुळे रक्तातील साखरचे प्रमाण वाढत नाही. ऑक्सिडीकरण रोधी पदार्थांचा देखील चांगला स्त्रोत असून त्यामुळे आजारांपासून शरीराचे संरक्षण होण्यास मदत होते.

भगर-बानयार्ड मिलेटस (इथिनोक्लोआ एस्कुलेंटा किंवा जापानी तृणधान्य)

भगर हे एक बहुउद्देशीय पिक असून खाद्यान्न व चारा या दोन्हीसाठी त्याची लागवड केली जाते. त्याचे हिंदीमधील सर्वसाधारण नाव सावा व मराठीतील नाव शामुळ आहे. तृणधान्यात प्रथिने, पाचक तंतू, आणि लोह भरपूर प्रमाणात असतात. मॅग्रेशियम, पोटॅशियम व जस्त यासारख्या खनिजांचा उत्तम स्त्रोत आहे. ग्लुटेनयुक्त पदार्थाची संवेदनशीलता असणाऱ्या लोकांसाठी चांगला पर्याय ठरु शकते.

सामा किंवा कोराळे-(ब्राऊन टॉप) (उरांचोला रॅमोस एल)

सामा किंवा कोराळे हे थायमिन, नियासिन व जीवनसत्व बी-६ चा उत्तम स्त्रोत आहे. दुय्यम पदार्थ म्हणून शिजविता येऊ शकत, वाढता येते, सुप किंवा स्ट्यूमध्ये तसेच पीठात देखील मिसळता येते. पाव, पॅनकेका किंवा इतर भाजलेल्या पदार्थात वापरता येते.

कोद्रा-(ब्राऊन टॉप)

कोद्रा तृणधान्यात सुमारे ११ टक्के प्रथिने आहेत, आणि प्रथिनांचे पौष्टिकमुल्य फॉक्सटेल बाजरीपेक्षा किंचित चांगले असल्याचे आढळले आहे, परंतु इतर लहान बाजरींच्या तुलनेत ते जास्त आहे.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान

पौष्टीक तृणधान्यांचे राज्यातील लागवडीखालील क्षेत्र, उत्पादन व उत्पादकता वाढावी यासाठी राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान राबविण्यात येत आहे. या माध्यमातून तृणधान्य उत्पादनाला प्रोत्साहन आणि तृणधान्याच्या महत्वाबाबत जनजागृती करण्यात येत आहे. शेतकऱ्यांसाठी पीक प्रात्याक्षिके, सुधारित व संकरीत प्रमाणीत बियाण्याचे वितरण, कीड व रोग व्यवस्थापनासाठी औषधांचे वितरण, जैविक खते व सूक्ष्म मुलद्रव्यांचा पुरवठा, विविध यंत्रे व कृषी औजारांचे वाटप, शेतीशाळा व शेतकरी प्रशिक्षणांचे आयोजन होत आहे. जिल्हास्तरीय कार्यशाळांद्वारे पौष्टिक तृणधान्य पिकांच्या उत्पादन वाढ व आहारातील वापर वाढ यासाठी विविध उपक्रम राबविण्याकरीता ११० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. नागरिकांसाठी पौष्टिक आहार आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ असे दोन्ही फायदे असल्याने हे अभियान उपयुक्त ठरणारे आहे.**संकलन : जिल्हा माहिती कार्यालय, पुणे**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# विधानसभा निवडणुकीत दमदार कामगिरी करणार!

## वंचित बहुजन आघाडीच्या आत्मचिंतन बैठकीत निर्धार

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**



मुंबई : लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर वंचित बहुजन आघाडीची राज्य कार्यकारिणी बैठक लोणावळा येथे पार पडली. महाविकास आघाडीसोबत युती न झाल्याने १८व्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडी आणि महायुती यांच्या विरोधात लढण्याची वेळ वंचित बहुजन आघाडीवर आली. या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीला पराभवाला सामोरे जावे लागले. या पराभवाची कारणे आणि त्यावरील उपाय यावर बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. संविधान वाचवण्यासाठी सामाजिक आणि राजकीय लढा, जो वंचित बहुजन आघाडीने सुरू केला होता, तो मुद्दा काँग्रेस आणि त्याच्या मित्रपक्षांनी हायजॅक केला. त्यामुळे अनेक समुदायांनी मोठ्या प्रमाणात काँग्रेसला पाठिंबा दिला. आम्हीही भाजप आणि त्यांच्या धोरणांच्या विरोधात उभे आहोत हे सांगण्यात आम्ही कमी पडलो. आम्ही जनतेला हे सांगण्यास अयशस्वी झालो की, जर तुम्ही वंचित बहुजन आघाडीला मत दिले, तर आम्ही भाजपच्या विरोधात इतरांपेक्षा जास्त चांगले काम करू. कारण, हा लढा आम्ही सुरू केला आहे आणि आम्ही कोणत्याही जानवेधारी नेतृत्वाला उत्तर देण्यासाठी बांधील नाही.

आगामी विधानसभा निवडणुकीत पक्ष दमदार कामगिरी करेल असा निर्धार यावेळी करण्यात आला. पक्षाचे निष्ठावंत मतदार हे आजही पक्षासोबत आहेत. त्यांच्याशी पुन्हा संवाद साधण्यात येईल. आम्ही वंचित बहुजन आघाडीच्या राज्य कार्यकारिणीचा विस्तार करू आणि आमची संघटनात्मक बांधणी मजबूत करू. पहिल्यांदा आणि दुसऱ्यांदा मतदान करणाऱ्या नव मतदारांशी संवाद साधण्यासाठी अभियान राबवण्यात येईल असा निर्णय यावेळी घेण्यात आला. लोकसभा निवडणुकीतील पराभवाने खचून न जाता फुले - शाहू - आंबेडकरी राजकारण प्रस्थापित करण्यासाठी आणि वंचित बहुजनांच्या हाती सत्ता देण्यासाठी पुन्हा नव्या ताकतीने मैदानात उतरू असा संकल्प यावेळी करण्यात आला. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीस प्रदेशाध्यक्ष रेखाताई ठाकूर यांच्यासह संपूर्ण राज्य कार्यकारिणी पदाधिकारी उपस्थित होते.

# श्री विठ्ठल रुक्मिणी मातेस भाविकाकडून ०२ लाख २८ हजार किंमतीची महावस्त्रे अर्पण

**पंढरपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबई येथील भाविक डॉ एम एस अल्वा यांनी श्री विठ्ठल रूक्मिणीमातेस ०२ लाख २८ हजार किंमतीची महावस्त्रे अर्पण केली आहेत. यावेळी मंदिर समितीच्या वतीने डॉ. अल्वा यांचा सत्कार मंदिर समितीचे विभाग प्रमुख संजय कोकीळ यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा व उपरणे देऊन सन्मान करण्यात आला. या महावस्त्रामध्ये सोवळे, उपरणे, अंगी, नऊवार साडी, बेडशीट, पिलो कव्हर इत्यादीचा समावेश आहे.

डॉ. अल्वा हे श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे निस्सिम भक्त असून मागील अनेक वर्षापासून श्रीच्या दर्शनासाठी येत असतात. त्यांनी यापूर्वी देखील अनेक वेळा महावस्त्रे व वस्तू श्रींच्या चरणी अर्पण केलेल्या आहेत.



# तथागत ग्रुप ने केले विविध क्षेत्रातील नामवंतांना सन्मानित

## तिरस्काराच्या विषारी वातावरणात पुरस्कार बनतो नवसंजीवनी : श्याम भाऊ उमाळकर

**बुलढाणा/दैनिक यशसिध्दि न्यूज/राहुल साबळे**

मेहकर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाटिका, अशोका हॉलमध्ये आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार वितरण तथा गुणवंत विध्यार्थी सत्कार कार्यक्रमाचे आयोजन तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने आयोजित करण्यात आले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. पंडित कांबळे साहेब राज्य अध्यक्ष सामाजिक न्याय विभाग( रा. कॉ. पा श. प.), या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून मा. श्याम भाऊ उमाळकर



सरचिटणीस कॉ. पा. म. राज्य हे होते.

प्रमुख उपस्थितांमध्ये तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष संदीपदादा गवई, माजी जी.प. सदस्य प्रा.आशिष रहाटे, उबाठा गटाचे युवानेते किशोर गारोळे, मनसेचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण जाधव, मुख्याध्यापिका सौ. मीनल जोहरे, भीम आर्मीचे सिद्धार्थ वानखेडे, ॲड. संदीप गवई, गोल्डन मॅन भाई दिलीप खरात, पत्रकार सुनील मोरे,अरुणभाऊ डोंगरे, ए. एस.आय. कोरडे साहेब, प्रकाश सुखदाणे, गजानन सावंत, डॉ. विकी सावंत, युनूस पटेल, दैनिक सेवाशक्ती टाइमचे वृत्त संपादक गजानन सरकटे, दैनिक मेहकर टाईमचे वृत्त संपादक विशाल फितवे उपस्थित होते.

सुरुवातीला तथागत गौतम बुद्ध यांच्या पुतळ्याला पुष्पमाला अर्पण करून व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रमुख अतिथींच्या स्वागत, सत्कारानंतर विशाल फितवे यांनी प्रास्तविक सादर केले.

त्यानंतर वर्ग १० मध्ये प्राविण्यश्रेणीत उत्तीर्ण झालेल्या गोरगरीब, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. त्यामध्ये पार्थ बळी, पूजा वाघमारे, पल्लवी तुरुकमाने, रोहित अवसरमोल, शिवानी भानुदास गवई, मारिया परविन शेख हरून, वैष्णवी श्री किसन इंगळे, साक्षी दिलीप ढोणे, पुनम भास्कर काकडे, नेहा उकंडा डोंगरदिवे, उज्वला श्रावण अंभोरे, वैष्णवी दशरथ गायकवाड, नम्रता रामदास जाधव, मयूरी रवींद्र मिसाळ, नम्रता शरद इंगळे, नेहा हिवाळे.

त्यानंतर मुख्य राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्याला सुरुवात झाली.

सुरुवातीलाच गिर्यारोहणाचा जागतिक विक्रम करणाऱ्या चार वर्षीय कु. अन्वी चेतन घाडगे हिला स्मृतिचिन्ह शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. तिच्यासोबत आलेल्या तिच्या आईने तिचा रोमहर्षक प्रवास कथन केला. त्यानंतर १७लोकांचे जीव वाचवीणारे, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार प्रा. डॉ. कृष्णा हावरे यांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र,भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.सजग पत्रकारिता करून जनतेला न्याय देणारे पत्रकार गजाननभाऊ सरकटे व सुनीलभाऊ मोरे यांना सन्मानित करण्यात आले.त्यानंतर भाई कैलास सुखधाने, अर्जुनदादा गवई, भाई दिलीप खरात, रविकुमार कांबळे, प्रकाशभाऊ पचेरवाल, मोहन सुरडकर, हसनभाई गवळी, आरतीताई इंगळे, मेहकर पोलीस स्टेशनचे ठाणेदार राजेश शिंगटे साहेब, भास्कर गुरचाल यांना भीमरत्न, राजा शिवछत्रपती महाराष्ट्ररत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. पत्रकारितेत उत्कृष्ट कार्य करणारे वृत्तसंपादक विशाल फितवे यांना तर अख्तरभाई कुरेशी यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

त्यानंतर सौ मीनल जोहरे यांनी मुलींच्या शिक्षणाबाबत आपली भूमिका मांडली.आपल्या अभ्यासपूर्ण भाषणात भाई कैलास सुखधाने यांनी विविध उदाहरण देत आजचे तिरस्कारयुक्त वातावरण विशद केले.प्रा. आशिष रहाटे यांनी यशस्वी मुलांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्यात.सत्काराला उत्तर देतांना डॉ. कृष्णा हावरे यांनी अनेक चित्तथरारक प्रसंग सांगतांना अनेकांच्या डोळ्यात पाणी आले.आपल्या अनुभवसंपन्न भाषणात काँग्रेसचे सरचिटणीस श्यामभाऊ यांनी फुले, शाहू, आंबेडकर यांचा विचार सर्वांनी मनात रुजवीला पाहिजे. शिकवणी वर्ग नसतांना अनेक मुलींनी मिळविलेले खरंच प्रेरणादायी आहे असे मत मांडले. अध्यक्षीय भाषणात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सामाजिक न्याय विभाग मा.पंडित कांबळे साहेब यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा दाखला देत त्यांचा ज्ञानाचा, वाचनाचा विचार रुजविणे काळाची गरज असल्याचे मत मांडले.या कार्यक्रमाचे बहारदार आणि अभ्यासपूर्ण सूत्रसंचालन डॉ. कृष्णा हावरे यांनी तर आभारप्रदर्शन युनूस पटेल यांनी केले. उत्कृष्ट कार्यक्रम केल्याबद्दल सर्व मान्यवरांनी तथागत ग्रुप व संदीपभाऊ गवई यांचे कौतुक केले.

# वंचित बहुजन आघाडी पुन्हा जोमाने काम करून विधान सभेत दमदार कामगिरी करू : चंद्रशेखर मडीखांबे

**सोलापूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**



वंचित बहुजन आघाडी सोलापूर जिल्हा कार्यकारणीच्या वतीने विविध तालुक्याचा दौरा करण्यात आला लोकसभेच्या निवडणुकीनंतर पुन्हा एकदा वंचित बहुजन आघाडी सोलापूर जिल्हा आणि आदरणीय बाळासाहेब आंबेडकर यांच्यावर नितांत निष्ठा ठेवणारे कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांच्या मेहनतीने पुन्हा एकदा वंचित बहुजन आघाडीचा झेंडा फडकवण्यासाठी अक्कलकोट या तालुक्यांचा कार्यकर्ता व पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली . आगामी काळात होणाऱ्या विधान सभेत दमदार कामगिरी कारणासाठी आणि जिंकून येण्यासाठी दिवस रात्र एक करून वंचित बहुजन आघाडी ला सते मध्ये बसवण्यासाठी प्रत्येक कार्यकर्ता हा रात्रंदिवस झटेल असा निर्धार या बैठकीत घेण्यात आला यावेळी जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे, जिल्हा महासचिव अनिरुद्ध दादा वाघमारे, युवक जिल्हा अध्यक्ष पांडुरंग खांडेकर, जिल्हा संघटक जालिंदर चंदनशिवे, युवक आघाडी अक्कलकोट तालुका अध्यक्ष शिलामनी बनसोडे, शहराध्यक्ष विशाल ठोंबरे महिला आघाडीच्या तालुका अध्यक्ष सारिका बनसोडे तालुका महासचिव गौतम गायकवाड, तालुका उपाध्यक्ष नरसिंह गायकवाड, विद्यार्थी सम्यक विद्यार्थी आंदोलन चे राज्य प्रवृत्त रविराज पोटे, युवक आघाडी शहराध्यक्ष संदीप बाळशंकर ,कामगार संघटनेचे तालुका अध्यक्ष सिद्धार्थ बनसोडे, उपाध्यक्ष महादेव थोरे, तालुका प्रसिद्धीप्रमुख संदीप गजदाने, गौतम गायकवाड निमगाव चे , बनजगोळ चे कटप्पा, इब्राहिमपूर चे रमेश बनसोडे लालू अण्णा बनसोडे, शहर उपाध्यक्ष शिवाजी चौगुले, शहर उपाध्यक्ष सुनील शिंगे,, संतोष घाटगे, आदी सह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते

# कवी सरकार इंगळी आता होणार सरपंच; खाकी... लय भारी

**निफाड/दैनिक यशसिध्दि न्यूज**

देशभक्तीवर आधारित असलेला खाकी.. लय भारी या मराठी चित्रपटांमध्ये पत्रकार व ज्येष्ठ कवी असलेले सरकार इंगळी हे खाकी ..लय भारी मराठी चित्रपटांमध्ये सरपंचाच्या भूमिकेमध्ये झळकणार असून यामध्ये ते भारत बागडे या सरपंचाची भूमिका निभवणार आहे, या चित्रपटांमध्ये त्यांनी सरपंचाची भूमिका करणार आहे चित्रपटाचे दिग्दर्शक पांडुरंग गोरे, ज्येष्ठ मार्गदर्शक व कास्टिंग डायरेक्टर श्री उद्धव फंगाळ साहेब यांनी त्यांची सर्वानुमते निवड केली आहे, पत्रकार कवी सरकार इंगळी यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहेव , त्यांनी आतापर्यंत चार ते पाच निवडणुका ग्रामपंचायत लढवल्या असून त्यांना राजकारणाचा, समाजकारणाचा अनुभव असल्यामुळे त्यांनी या भूमिकेमध्ये शिरका करून चांगल्या प्रकारे भूमिका निभवणार आहे , खाकी... लय भारी हा मराठी चित्रपट देशभक्ती वरती आधारित.



असल्यामुळे गावच्या घडामोडी व गावचे राजकारण यामध्ये दाखवण्यात आले आहे , या चित्रपटामध्ये मध्ये भारत बागडे नावाच्या सरपंचाची मुख्य भूमिका या खाकी ...लय भारी मराठी चित्रपटांमध्ये कवी सरकार इंगळी हे भूमिका करणार आहे, या भूमिकेला न्याय देणार आहे , लवकरच हा मराठी चित्रपट संपूर्ण महाराष्ट्रभर प्रदर्शित करण्यात येणार आहे, आमच्या चित्रपटाची प्रेक्षक आता आतुरतेने वाट पाहत आहे असे चित्रपटाचे निर्माते - दिग्दर्शक पांडुरंग गोरे यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले आहे

# टाकळीवाडीमध्ये भुईमूग पीक धोक्यात

**पत्रकार नामदेव निर्मळे**

टाकळीवाडी तालुका शिरोळ येथे मोठ्या जोमात भुईमूग या पिकाची पेरणी झाली. पावसाने सुद्धा प्रतिसाद दिल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी भुईमूग पिकाची पेरणी केली. परंतु गेली चार-पाच दिवस पावसाने दांडी मारल्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त झालेला आहे. भुईमूग उगवणीला अडचणी येत आहेत. टाकळीवाडी गावाला मुरमाड शेती जास्त असल्यामुळे उन्हामुळे शेतीमधील ओलावा कमी होत आहे. शेतकऱ्याचा पावसाची वाट पाहत आहे. पावसाने दांडी मारल्यामुळे अनेक पशु,पक्षी, भुईमुगाचे नुकसान करत आहेत. सध्या शेतकरी भुईमुगाला पाणी देण्यामध्ये व्यस्त आहे.

# राजमाता जिजाऊ यांच्या जीवनात अनेक संकटे आली : सुनील पुजारी

**सिंदगाव/दैनिक यश सिद्धी न्यूज.**

नळदुर्ग-ज्ञानदीप कलोपासक मंडळ नळदुर्ग संचलित धरित्री विद्यालय आलियाबाद नळदुर्ग येथे ३५० वी राष्ट्रमाता जिजाऊ पुण्यतिथी साजरी करण्यात आले. प्रतिमेचे पूजन शाळेचे मुख्याध्यापक महाराष्ट्र शासन राज्य पुरस्कार प्राप्त सुनील पुजारी यांच्या हस्ते संपन्न झाले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहशिक्षक रमेश चव्हाण यांनी केले. बारा वर्षाच्या बाल शिवरायांना घेऊन पुणे शहरात आलेल्या राजमाता छत्रपती जिजाऊ यांनी आपल्या मुलाला स्वराज्याची प्रेरणा देत परकीय मोगल, आदिलशाही, सत्तेच्या विरोधात कुशल संघटन करीत हिंदवी स्वराज्याचा पाया घातला. कर्तव्यनिष्ठ स्वराज्य संकल्प, जिद्दी, निर्धारि, करारी व्यक्तिमत्त्वाच्या या आदर्श मातेने राजा शेतकऱ्यांच्या प्रजेचा रक्षण करता तर असतोच, पण तो राज्याचा उपभोग शून्य स्वामी हे असतो, असे संसार ही घडवले. अनेक आव्हाने आणि संकटाशी सामना करत छत्रपती शिवरायांनी सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्या स्वराज्याची स्थापना केली आणि सहा जून १६७४ रोजी मस्त राजधानी रायगडावर आपल्या आणि प्रजेच्या अत्यंत प्रिय राजाचा सिंहासन रोड होण्याचा अपूर्व राज्याभिषेक सोहळा ही या माऊलीने पाहिला. स्वराज्याचे स्वप्न त्यांच्या डोळ्यासमोर साकार झाले. जीवनाची इति श्री झाली. शतकानुशतके परकीय सत्तेच्या गुलामगिरीच्या साखळदंडात जखडलेल्या प्रजेला त्याचा राजाही मिळाला अशा या आदर्श स्वातंत्र्य प्रेरक राजमातेचे महानिर्वाण राज्याभिषेकानंतर अवघ्या बारा दिवसाने म्हणजेच १७ जून १६७४ रोजी झाले. देव, धर्म आणि देश या त्रिसूत्रीचा मंत्र जागर करीत प्रजेला आणणे आपल्या मुलाला स्वातंत्र्याचे बाळकडू पाजत स्वराज्याची निर्मिती करणाऱ्या या राजमातीची केवळ भारतातच नव्हे तर साऱ्या जगभरात आदर्श माता, स्वराज्य संकल्प माता, आदर्शाचे पोवाडे साऱ्या जगभरात गायिली जात आहेत असे मत




सुनील पुजारी यांनी मांडले. याप्रसंगी विद्यालयातील गायत्री गायकवाड, भाग्यश्री फिस्के, गायत्री वाघमारे, नवल वाघमारे, आयोध्या कडदुरे, लक्ष्मी पवार, संस्कृती कदम, ज्ञानेश्र्वरी पवार या विद्यार्थ्यांने जिजाऊच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन युवराज होळे यांनी केले. आभार प्रदर्शन शुभांगी कारंजे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी अण्णाप्पा सातलगावकर, गोरख जगताप, जगदेवी शंकरशेट्टी, विठ्ठल पाटील शिक्षकेत्तर कर्मचारी पालक, विद्यार्थी उपस्थित होते.

# मंगळवेढा आठवडा बाजार मध्ये आमदार आवताडे यांची अचानक भेट

## शेतकरी व व्यापाऱ्याकडून जाणून घेतल्या समस्या

**मंगळवेढा/दैनिक यशसिध्दि न्यूज**

मंगळवेढा शहरामध्ये भरत असलेल्या बाजार मध्ये नागरिकांच्या सोयी सुविधा कशा आहेत हे पाहण्यासाठी आमदार समाधान आवताडे यांनी सोमवार आठवडा बाजार दिवशी पाहणी करून व्यापाऱ्यांना,शेतकऱ्यांना व ग्राहकांना गैरसोयींना सामोरे जावे लागत असल्याचे आमदार आवताडे यांचे लक्ष्यात आल्यानंतर त्यांनी नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना चांगलेच फैलावर घेतले व्यापारांसाठी व शेतकऱ्यांसाठी बांधलेल्या बाजार कट्ट्यावर अनेकांनी खोकी टाकली आहेत,वाहने लावले आहेत व शेतकऱ्यांना खाली चिखलात बसावे लागत आहे याबाबत नगरपालिकेच्या प्रशासनास जाब विचारत तुमचे बाजारवर व कामावर लक्ष असते का? ग्रामीण भागातून बाजार साठी व खरेदीसाठी येणाऱ्या नागरिकांना अजिबात त्रास होता कामा नये,अशा शब्दात मुख्याधिकाऱ्यांची कान उघडणी केली.



सध्या पाऊस सुरू असल्यामुळे बाजार आवारामध्ये अनेक ठिकाणी पाणी साचले आहे पूर्ण बाजारामध्ये सिमेंट काँक्रीट केले असतानाही त्यावर नगरपालिकेने मुरूम टाकून अकलेचे तारे तोडले आहेत अनेक ठिकाणी पाणी साठत असून भाजीपाला विक्रीसाठी शेतकऱ्यांना बसण्यास अडचणी होत आहेत त्यामुळे बाजार कट्ट्यावरील केलेले अतिक्रमण काढून बाजार व्यवस्थित शेडमध्ये भरवण्याच्या सूचना प्रशासनास दिल्या. त्याचबरोबर व्यापारी महिला व बाजारला येणाऱ्या ग्राहकांना स्वच्छतागृहाची सोय नसल्यामुळे त्यांची कुचंबणा होत आहे त्यावरही ताबडतोब उपाययोजना करा त्याचबरोबर आठवडा बाजार मध्ये अजून काही निधीची कमतरता आहे का? आठवडा बाजार मध्ये साठत असलेले पाणी बाहेर काढण्यासाठी काय उपाययोजना कराव्या लागतात याबाबत सविस्तर प्रस्ताव सादर करून द्या ताबडतोब निधीच्या तरतूद करतो मात्र शेतकऱ्यांचे होणारे हाल कदापिही सहन करणार नाही अशा शब्दात नगरपालिका प्रशासनास सुनावले. बाजारला येणाऱ्या ग्राहकांच्या वाहनास व्यवस्थित पार्किंगची सोय नगरपालिकेकडून करण्यात आली नाही रस्त्यावर वाहने लावून वाहतुकीस अडथळा होत आहे याबाबत पोलीस प्रशासनाची खडसावून वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्याचा सूचना दिल्या. आमदार समाधान आवताडे यांनी अचानक आठवला बाजार मध्ये जाऊन पाहणी करत व्यापारी ग्राहक यांचे विचारपूस केली त्यावेळेस पोलीस प्रशासन व नगरपालिका प्रशासन यांची तारांबळ उडाली. यावेळी त्यांच्यासोबत प्रशासन अधिकारी साळुंखे, उपनगराध्यक्ष चंद्रकांत पडवळे,शेतकरी संघटनेचे युवराज घुले,पोलीस निरीक्षक रणजीत माने,महादेव जाधव,सचिन शिंदे उपस्थित होते.

# सोलापुरातील जेष्ठ आंबेडकरी नेते माजी उपमहापौर प्रमोद दादा गायकवाड शहर मध्यसाठी इच्छुक

**सोलापूर/दैनिक यशसिध्दि न्यूज/** महेश गायकवाड

सोलापूर शहरातील जेष्ठ आंबेडकरी नेते आणि माजी उपमहापौर प्रमोद दादा गायकवाड हे सोलापूर शहर मध्य साठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट या पक्षाकडून विधानसभा निवडणुकीच्या आखाड्यात उतरण्याचा निर्णय घेतला असून त्यांनी पक्षाकडे आपण इच्छुक असून आपणास उमेदवारी मिळावी अशी मागणी आपण जेष्ठ नेते शरद पवार यांच्या कडे करणार असल्याची माहिती स्वतः प्रमोद दादा गायकवाड यांनी आज येथे पत्रकारांशी बोलताना दिली.

सोलापूर शहर मध्यच्या काँग्रेस आमदार प्रणिती शिंदे या खासदार झाल्याने आता त्यांच्या मतदारसंघावर अनेकांचा डोळा आहे. मागील पंधरा वर्षे प्रणिती शिंदे आमदार असल्याने कुणाचीही दाळ शिजली नाही परंतु आता त्या खासदार झाल्याने अनेक जणांना आमदारकीची स्वप्न पडू लागली आहेत.

अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसनेही या मतदारसंघावर आपला दावा केला आहे, भारतीय जनता पार्टीच्या उमेदवाराला एक लाखाचे मताधिक्य देण्याच्या ढगात गोळ्या मारणाऱ्या शिवसेनेच्या एका नेत्याला ही आमदारकीचे स्वप्न पडत आहे आता तर सोलापुरातील एक आंबेडकरी समाजातील नेत्याने शहर मध्य मतदारसंघावर आपला दावा केला आहे. तो नेता म्हणजे शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद गायकवाड होय. प्रमोद गायकवाड यांचा स्वतःचा



पीजी हा पक्ष आहे. पण ते शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आहेत.

काँग्रेसच्या नूतन खासदार प्रणिती शिंदे यांच्या विजयामध्ये त्यांचाही वाटा पाहायला मिळतो. अनेक जण शहर मध्य या मतदारसंघावर आपला हक्क सांगत आहेत. त्यामध्ये प्रमोद गायकवाड यांनीही आपला दावा केला आहे. गायकवाड यांनी राष्ट्रीय नेते शरद पवार यांची भेट घेऊन शहर मध्य या मतदारसंघातून आपण इच्छुक आहोत अशी श्रेष्टींकडेच्या इच्छा व्यक्त केल्याचे त्यांनी



**प्रमोद दादा गायकवाड यांचा पी जी ग्रुप नावाचा स्वतंत्र राजकिय पक्ष देखील असुन या पक्षाच्या माध्यमातुन त्यांनी आंबेडकरी चळवळीला मोठे सहकार्य करत सोलापुरातील आंबेडकरी चळवळ गतिमान करण्यासाठी आपला हिस्सा दिले आहेत त्यामुळें सोलापूर जिल्ह्यात त्यांना मानणारा एक मोठा वर्ग आहे विशेष म्हणजे प्रमोद दादा गायकवाड यांचे सर्व राजकीय पक्षांतील मंडळी सोबत चांगले संबंध असुन सर्व राजकीय नेते मंडळी त्यांच्या शी सलोख्याचे संबंध ठेवून आहेतः ही प्रमोद दादा गायकवाड यांची जमेची बाजु असुन प्रमोद दादा गायकवाड यांच्या पत्नी नुतन ताई गायकवाड या राष्ट्रवादीकाँग्रेस च्या नगरसेविका आहेत.**

स्वतः माध्यमांशी बोलताना सांगितले.

प्रमोद गायकवाड हे माजी उपमहापौर आहेत. त्यांच्या पत्नी नगरसेविका होत्या. पीजी ग्रुपच्या वतीने त्यांनी आपले शहरांमध्ये कार्यकर्त्यांचे जाळे पसरवले आहे. त्यांच्या पत्नी एमआयएम पक्षाच्या नगरसेविका होत्या त्यानंतर त्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेल्या. त्यांच्यासोबत त्यांचे पती ही राष्ट्रवादीमध्ये गेले आहेत आता त्यांनीही आमदारकीसाठी बाशिंग बांधले असून सोलापूर शहरातील तीन विधानसभा मतदारसंघांमध्ये मध्य ला आता चांगलेच डिमांड वाढल्याचे पाहायला मिळत आहे. माजी उपमहापौर राहिलेले प्रमोद दादा गायकवाड हे आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते असुन त्यांचे आंबेडकरी चळवळीत मोठे योगदान राहिले आहे.

# विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेमध्ये शिक्षकांबरोबर पालकांचीही भुमिका महत्वाची : गायकवाड



**पंढरपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

यशाच्या शिखरावरती असणारा कोणताही गुणवंत विद्यार्थी हा खर्या अर्थाने शाळेचा नावलौकीक असतो तर असे गुणवंत विद्यार्थी घडवण्यासाठी शाळेतील शिक्षक तर विशेष परिश्रम घेतच असतात. परंतु विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेमध्ये शिक्षकांबरोबरच पालकांचीही भुमिका महत्वपुर्ण ठरत असते. असे प्रतिपादन श्री शिवाजीभाऊ बाबा पाटील विद्यालयाचे मुख्याध्यापक औदुंबर गायकवाड यांनी केले.

पंढरपूर तालुक्यातील रोपळे येथील श्री शिवाजीभाऊ बाबा पाटील विद्यालयामध्ये पुस्तक वाटप, नवागतांचे स्वागत व गुणवंत विद्यार्थ्यांच्या सन्मान कार्यक्रमाप्रसंगी गायकवाड बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नागनाथ माळी हे होते. तर यावेळी कार्यक्रमासाठी खरेदी विक्री संघाचे संचालक नारायण गायकवाड, रोपळे विकास प्रितष्ठानचे अर्जून भोसले, मधुकर गुंजाळ , सुरेश निंबाळकर, विनायक निंबाळकर, सिध्देश्र्वर भोसले, शंकर कदम यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्रस्ताविक शिक्षक सोमनाथ जगताप यांनी केले तर माजी कृषी अधिकारी मधुकर गुंजाळ यांनी गुणवंत विद्यार्थी आणि मार्गदर्शक शिक्षकांचे कौतुक केले. यावेळी नवागतांचे स्वागत, पुस्तक वाटप करून शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. पुढे बोलताना मुख्याध्यापक गायकवाड यांनी पालक आणि ग्रमस्थांकडून शाळेसाठी होणार्या सहकार्याबद्दल ऋण व्यक्त करीत शाळेच्या गुणवत्तेसाठी मार्गदर्शक ठरणार्या शिक्षकांचे अभिनंदन केले. तर येत्या शैक्षणिक वर्षामध्ये अधिकाधिक शैक्षणिक उपक्रम राबवण्याची ग्वाही दिली. या कार्यक्रमासाठी विद्यार्थी, पालक, ग्रमस्थ उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# विद्यार्थीच्या शैक्षणिक जिवनाचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे : सुनिल पुजारी

**नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे :**

ज्ञानदीप कलोपासक मंडळ संचलित धरित्री विद्यालय नळदुर्ग आलियाबाद येथे शाळेच्या पहिल्याच दिवशी ८० टक्के उपस्थिती धरित्री विद्यालयातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक साहित्य देऊन स्वागत करण्यात

विद्यार्थांच्या सर्वांगिण शैक्षणिक जिवनाचा विकास झाला पाहिजे आसे प्रतिपादन विद्यालयाचे मुख्याध्यापक , महाराष्ट्र शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त सुनिल पुजारी यांनी केले

विद्यालयात दर्जेदार उपक्रम राबवले



आले . निसर्गाने जसे तुमचे पावसाच्या रूपाने स्वागत केले. तसे आम्ही तुमचे पुष्प, पाठ्यपुस्तक, देऊन स्वागत करीत आहोत या शैक्षणिक साहित्याचा जास्तीत जास्त वापर करून आपल्या गुणवत्तेत वाढ करण्याचा प्रयत्न करा आज जिकडे तिकडे मुलीचा धबधबा निकालात दिसत आहे त्यासाठी मुलांनी सुद्धा अभ्यासात स्वतःला गुंतून घ्यावे. शाळेला नेहमीच उपस्थित राहावे अभ्यास करावा, शाळेतील जास्तीच्या अनुपस्थितीमुळे विद्यार्थ्यांचे प्रगती होत नसते म्हणून जातात दहावी परीक्षेत विद्यालयाने उज्वल यश संपादन केले आहे. शाळेचे वातावरण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास पोषक आहे. असे प्रतिपादन विद्यालयाचे मुख्याध्यापक महाराष्ट्र शासन राज्य पुरस्कार प्राप्त सुनील पुजारी यांनी केले आहे

शैक्षणिक वर्षाच्या विद्यार्थ्यांना व शिक्षकांना शुभेच्छा ही दिल्या. उन्हाळ्याच्या सुट्ट्या संपल्यानंतर १५ जून पासून ग्रामीण भागात नवीन शैक्षणिक वर्षाला सुरुवात झाली. नवगतांचे स्वागत नवगतांचे स्वागत व प्रवेशोत्सव कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाचे स्वागत आणि विद्यालयाचे सहशिक्षक अण्णाप्पा सातलगावकर यांनी केले. यावेळी पालक मान्यवर व शिक्षकांच्या हस्ते वृक्षारोपण करत विद्यार्थी व विद्यार्थिनींचे गुलाब फूल देऊन स्वागत करण्यात आले आणि पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. इयत्ता पाचवी ला प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे हार्दिक स्वागत सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी पुष्पवृष्टी आणि टाळ्याच्या गजरात केले. शालेय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार योजने अंतर्गत खीर विद्यार्थ्यांना देऊन पहिला दिवस गोड करण्यात आला. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख युवराज होळे यांनी केले. तर आभार प्रदर्शन शुभांगी कारंजे यांनी मानले. यावेळी कार्यक्रम यशस्वीतेसाठी रमेश चव्हाण, गोरख जगताप, जगदेवी शंकर शेट्टी, विठ्ठल पाटील शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, पालक, विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

# मारुती बनसोडे व पांडुरंग घोडके यांची अफार्म चे मराठवाडा विभागीय मार्गदर्शक मंडळावर सदस्य म्हणून निवड

**नळदुर्ग/प्रतिनिधी**



परिवर्तन सामाजिक संस्था नळदुर्ग ता. तुळजापूरचे संस्थापक सचिव मारुती बनसोडे यांची अफार्म मराठवाडा विभागीय मार्गदर्शक मंडळावरती सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे. मारुती बनसोडे हे गेली ३८ वर्षे सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहेत . तर परिवर्तन सामाजिक संस्थेच्या माध्यमातून गेली अठ्ठावीस वर्षे ते काम करीत आहेत. शेतकरी महिला युवक यांच्यासाठी परिवर्तन संस्था काम करीत आहे .रेन वॉटर हार्वेस्टिंग हा प्रकल्प सध्या कळंब तालुक्यातील तीस गावात आयसीआयसीआय बँकेच्या मदतीने सुरू आहे. अफार्म पुणे यांच्याकडून तुळजापूर तालुक्यातील चार गावात अल्प खर्चिक शाश्र्वत शेती तंत्रज्ञान प्रचार प्रसार चे काम सुरू आहे. दोन गावांमध्ये पौष्टिक तृणधान्य प्रोत्साहन अभियान हा ही कार्यक्रम राबविण्यात येत आहे. शासनाच्या अनेक योजनांमध्ये परिवर्तन संस्था सहभागी होऊन गरजू लोकांच्या पर्यंत या योजना पोहोचविण्याचे काम ते करीत आहेत. अफार्म संस्थेच्या मराठवाडा विभागीय मार्गदर्शक मंडळामध्ये मारुती बनसोडे यांची निवड दिनांक १५/६/२०२४ रोजी अफार्म चे सचिव तथा मराठवाडा विभागीय मंडळाचे अध्यक्ष एच.पी.देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली या बैठकीत मराठवाड्यातील आठ जिल्ह्यातून संस्था प्रतिनिधी ची निवड करण्यात आली यामध्ये धाराशिव जिल्ह्यातून परिवर्तन सामाजिक संस्था नळदुर्ग चे मारुती बनसोडे व धाराशिव येथील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे सामाजिक संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग घोडके यांची मराठवाडा विभागीय मार्गदर्शक मंडळावर सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे.अफार्मचे अध्यक्ष तथा पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.व्यंकट मायंदे सर, अफार्मचे कार्यकारी संचालक सुभाष तांबोळी , सचिव एच .पी .देशमुख यांनी त्यांच्या निवडीची घोषणा केली आहे .या निवडीबद्दल मारुती बनसोडे व पांडुरंग घोडके यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

# नागणसूर कन्नड शाळेत शाळा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा

**अक्कलकोट/दैनिक यश सिध्दी न्युज**

नागणसूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड मुले-मुली शाळेत सन २०२४-२५ चे शाळा प्रवेशोत्सव पहिली वर्गात नव्याने दाखल झालेल्या विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प, शालेय साहित्य पुस्तके ,दप्तर, गणवेश देऊन औक्षण आणि पुष्पवृष्टी करून स्वागत करत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कन्नड मुली शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गंगाधर भासगी होते.सावित्रीबाई प्रतिमेचे पूजन कन्नड मुले शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बसनिंगय्या स्थावरमठ यांच्याहस्ते करण्यात आले.

प्रारंभी कन्नड मुले व मुली शाळेत पहिली वर्गात आणि इतर वर्गात नव्याने प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प,फुगे पाठ्यपुस्तक,गणवेश, बॅग इतर शैक्षणिक साहित्य देऊन पुष्पवृष्टी करून औक्षण करून नवागतांचे स्वागत करण्यात आले.तसेच इयत्ता दहावी आणि बारावी परीक्षेत प्रचंडे प्रशाला व शेळके प्रशालेत अनुक्रमे प्रथम,द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावलेल्या विद्यार्थ्यांचे मान्यवरांचे हस्ते सत्कार करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आले.तसेच नागणसुरचे सुपुत्र भारतीय वैज्ञानिक क्षेत्रात सुमारे ३६ वर्षे सेवा करून सेवानिवृत्त झालेल्या राजशेखर नाविदगी यांच्या सत्कार करण्यात आले.

या समयी नागय्या मठपती , भिमाशंकर धानशेट्टी, विश्र्वनाथ प्रचंडे, श्रीशैल गुरव, सिद्धाराम माशाळकर, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य , शिक्षक कल्लय्या गणेचारी सर, खाजप्पा किणगी, शरणप्पा फुलारी, लक्ष्मीकांत तळवार, बसवराज स्वामी, राजशेखर खानापुरे, शिवशरण म्हेत्रे, राजशेखर कुर्ले, शांता तोळणुरे, विजयश्री एंटमन, लक्ष्मीबाई देगाव, चन्नम्मा बिरादार, पालक वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शरणप्पा फुलारी यांनी केले तर आभार शिवशरण म्हेत्रे यांनी मानले.